महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००

फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in


**क्र. २१९३(२)/कृषि/२०२१/१९** **दिनांक: ३० डिसेंबर, २०२२**

# -:प्रसिध्दीपत्रक:-

**विषय :- महाराष्ट्र कृषि सेवा मुख्य परीक्षा- २०२१ निकालाबाबत....**

**संदर्भ :- अधिसूचना क्र. ०६७/२०२२ दिनांक १३ जुलै, २०२२**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२२ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र कृषि सेवा मुख्य परीक्षा-२०२१ चा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे.

२. उपरोक्त निकालानुसार मुलाखतीसाठी प्रथमदर्शनी पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांना त्यांच्या परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्याच्या पृष्ठर्थ मुलाखतीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून मुलाखतीस बोलविण्यात येत आहे. उमेदवारांनी आवेदन पत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक मूळ प्रमाणपत्रांची पूर्तता मुलाखतीचे वेळी न केल्यास, तसेच अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासताना व अन्य कारणांमुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल.

३. प्रस्तुत मुख्य परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे (SMS) कळविण्यात येईल.

४. प्रस्तुत मुख्य परीक्षेमधून मुलाखतीकरीता अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची फेरपडताळणी करावयाची आहे. अशा उमेदवारांनी गुणपत्रक प्रोफाइलमध्ये प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (आयोगाच्या संकेतस्थळावरील सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्र. ६.४ कृपया पहावी.)

५. प्रस्तुत परीक्षेच्या मुलाखतीकरीता बोलविण्यात येणाऱ्या खेळाडू उमेदवारांबाबत करावयाच्या कार्यवाही संदर्भात मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेतील ४.१३ नुसार खेळाडूसंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार कार्यवाही अनुसरण्यात येईल.

६. प्रस्तुत परीक्षेचा निकाल आरक्षणाच्या / समांतर आरक्षणाच्या / इतर मुद्यांसंदर्भात विविध मा.न्यायालयात / मा.न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

७. मुलाखतीचा सविस्तर कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल.

ठिकाण :- मुंबई

उपसचिव (परीक्षोत्तर-राजपत्रित परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.